# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीतातील सा...रे...ग
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. मीनल अनंत केंकरे

संगीता विषयी काहीच कळत नाही मला,
ना सुर तालाची जाण, ना गायला गोड गळा,
संगीत म्हणजे नेमके काय याचा विचार करत बसले,
माझे विचार ऐकून तेव्हा माझेच मन हसले.

सा असतो साधेपणाचा
लोकसंगीतात रमून जाण्याचा
हातात हात गुंफून तारपा नाचण्याचा
ढोल ताशाच्या तालावर लेझीम खेळण्याचा.

रे असतो रेशमाच्या मखमालीचा
प्रियकरासोबत युगल गीत गाण्याचा
त्याच्या डोळ्यात हरवून जाण्याचा
मिळून नवे विश्व निर्माण करण्याचा.

ग असतो गर्जनेचा
देशाविषयी असलेल्या गर्वाचा, प्रेमाचा
सावरकरांसोबत स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करण्याचा
पोवाडा गाऊन शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा देण्याचा.

म असतो आईच्या ममतेचा
लहानपणी तिने गायलेल्या अंगाई गीतांचा
आपल्या पाठीवरून हळुवार हात फिरवीत
आईने केलेल्या प्रेमाच्या वृष्टीचा.

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

प असतो परमात्म्याचा
भक्तीगीतांतून होणाऱ्या त्याच्या दर्शनाचा
भजन, अभंग, गात, नाचत
स्वतःला विसरून त्याच्यात विलीन होण्याचा.

ध असतो धरतीचा
आपल्या शेतकरी बांधवांचा
बैलासोबत शेतात दिनरात राबताना
ओठांवर असलेल्या गोड गीतांचा.

नी असतो निरागसपणाचा
बोबड्या बोलीत गायलेल्या बालगीतांचा
कधी चंदामामा सोबत गोष्टी करण्याचा
तर कधी मोरा सोबत पावसात नाचण्याचा.

हे सारे मिळून तयार होते, ते असते संगीत.

जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत राहणारे
सुख दुःखात साथ देणारे
आपल्या भावनांना अलगत स्पर्श करणारे
व्यक्त होण्याचे एक सुंदर साधन.

Anahat Music Therapy